**सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात**

**नि.फौ.ख.क्र. १०८/२०२३** **निशाणी क्र.२४ खाली**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. ए.एस.राशिनकर यांचे मार्फत –**

हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद देण्यासाठी माझे वडील पोलीस स्टेशनला माझे अगोदर गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे वडीलांना मला घेवुन या असे म्हटले म्हणुन मी वडीलांसोबत गेले. माझा मोबाईल क्र. ८९७५६८१९३७ हा होता हे मला निश्चित आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या नंबरवर माझे इन्टाग्राम अकाऊंट होते व ते अकाऊंट गायत्री नावाने होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अकाऊंटवरुन मी आरोपीस व्हीडीओ कॉल करायचे, चाटिंग करायचे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, आम्ही दोघेही एकमेकांना व्हीडीओ कॉल करायचो, चाटिंग करायचो. हे म्हणणे खरे आहे की, मी गेल्या ७ ते ८ वर्षापूर्वी महात्मा गांधी शाळेमध्ये शिकत होते. हे मला माहित नाही की, आरोपी हा न्यु कॉलेजमध्ये शिकत होता. महात्मा गांधी व न्यु कॉलेज हे एकाच रस्त्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते शाळा व कॉलेज रस्त्याच्या दोन बाजुला आहे.

हे म्हणणे खरे आहे की, मी बौध्द समाजाचा आहे व आरोपी हा चर्मकार समाजाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझेमध्ये पूर्वी मैत्रीचे संबंध होते व नंतर त्याचे प्रेमसंबंधात रुपांतर झाले. त्यामुळे आम्ही दोघांनी अनेक ठिकाणी वेगवेगळे फोटो काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमची दोघांची एकमेकासोबत लग्न करण्याची प्रामाणिक इच्छा होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दोघांचे समाज वेगवेगळे असल्यामुळे माझे आई वडीलांचा आमच्या लग्नाला व प्रेमसंबंधाला विरोध होता. हे म्हणणे खरे आहे की, मंडप बांधणे, पोस्टर लावणे, बॅनर लावण्याचे काम माझे

वडील करतात. हे मला माहित नाही की, त्यामुळे माझे वडीलांचे सर्व राजकिय पक्षाशी चांगले संबंध आहेत. प्रकरणात दाखल असलेला फोटो आमच्या दोघांच्या समतीने काढलेला आहे त्यात कोणत्याही प्रकारची छेडछाड झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेसबुकवर व्हायरल झालेला फोटो मी पाहिलेला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझा पाठलाग केला नाही व मला धमकी दिली नाही, माझी छेडछाड केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या सांगण्यावरुन आरोपीने तुझ्या वडीलांना तोंड दाखविण्यास जागा ठेवणार नाही असे धमकी दिल्याचे मी खोटे सांगत आहे. माझे आता पर्यंत ३ ते ४ वेळेस पोलीसांनी जबाब नोंदविले.

माझा न्यायाधीशांसमक्ष जबाब झाला होता. आरोपीचे वकीलांनी साक्षीदाराचा न्यायाधीशांसमक्ष झालेला जबाब दाखविला त्यामुळे त्यास **निशाणी क्र. २९** देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझा कधी जबरदस्तीने फोटो काढला नाही. ११ मार्च २०२३ रोजी माझे भावाने व्हायरल झालेला फोटो मला दाखविला होता. त्यानंतर १५ मार्च २०२३ रोजी मी पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेली. १४ मार्च २०२३ रोजी आरोपीने मला आडविले होते. आरोपीने मला घराकडे जाताना आडविले. परंडा ते देवगाव जाणारा रस्ता हा रहदारीचा रस्ता आहे. ब–याच लोकांची त्या रस्त्याने ये–जा असते. आरोपीने मला आडविले तेव्हा आसीफ तसेच गणेश खंकाळ याने पाहिले. या व्यतिरीक्त लोकांना पाहिले असेल त्या लोकांची नावे माहित नाहीत. आसीफ तसेच गणेश खंकाळ हे माझ्या वडीलांकडे मंडपाचे काम करतात.

हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांचा आरोपी व माझे मैत्रीला व विवाहाला सुरुवातीपासुन विरोध होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी मला आरोपीविरुध्द फिर्याद देण्यासाठी सांगितले त्यामुळे मी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे

नाही की, मी माझे वडीलांच्या सांगण्यावरुन आज खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.07.02 16:38:32 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–०२.०७.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.